| अ.क्र. | कार्यक्रम | संक्षिप्त अहवाल |
|---|---|---|
| 1 | मतदार जनजागृती कार्यक्रम<br><br>**दिनांक** 19/04/2024 | दिनांक 19/04/2024 रोजी एनएसएस युनिट शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविद्यायालय अमरावती तर्फे मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप कक्षा द्वारा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी सौरभ कटियार यांच्या मार्गदर्शनात आयोजित तिरंगा महा रॅलीत सहभाग घेण्यात आला. नेहरू मैदान येथून महा रॅली सायंकाळी काढण्यात आली. ही महा रॅली नेहरू मैदान , राजकमल चौक जयस्तंभ , मालिवूय चौक येथून इरविण चौक पोचली. या ठिकाणी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून संविधानाचे प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले. सदर रॅलीत महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रो मोना अग्रवाल , डॉ योगेश अग्रवाल, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. |
| 2 | आंतरराष्ट्रीय योग दिन<br><br>**दिनांक** 21/06/2024 | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अमरावती येथे दिनांक 21 जून 2024 रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व योग प्रशिक्षक म्हणून भावन ताई धोरे व सदस्य प्रवीण धरपळ , श्रद्धा गणेशपुरे , आर्ट ऑफ लिविंग, अमरावती उपस्थित होते. यावेळी भावन ताई धोरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी स्वस्थ शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योग्य खूप आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. तसेच त्यांनी योगाचे प्रकार व त्याचे फायदे याचे प्रशिक्षण दिले पद्मासन, अर्धमत्स्येंद्रासन, वीरभद्रासन, धनुरासन, प्राणायम इत्यादी योगासने उपस्थितांकडून करवून घेतली. सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे करण्यात आले. या कार्यक्रमावेळी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य प्रा. डॉ.नाजमा ईनामदार व शिक्षकगण प्रा. दिपाली घोरपडे, प्रा दीपक पवार,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. |
| 3 | वृक्ष लागवड मोहिम<br><br>**दिनांक** 21/06/2024 | पर्यावरणाचे समलोकाकरिता एक प्रयत्न करण्याच्या हेतूने तसेच मा मुख्यमंत्री यांनी व्यक्त केलेली अपेक्षापूर्ती करण्याचा हेतूने आपल्या निर्देशानुसार वृक्षोत्सव पंधरवाडा शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अमरावती येथे दिनांक 21 जून 2024 रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . याप्रसंगी देशी वृक्षांची लागवड महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आली. नीम, निरगुंडी, जामून, अर्जुन , अशोका, शमी, पिपळ, रिठा , हिरडा, बेहेडा, आवळा, चिंच, बोर, अश्या 20 वृक्षांचे महाविद्यालयाच्या रासेयो विभागाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले व विद्यार्थ्यांना संगोपन करण्याची जबाबदारी विभागून देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रो मोना अग्रवाल यांनी केले. या कार्यक्रमावेळी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य प्रा. डॉ.नाजमा ईनामदार व शिक्षकगण प्रा डॉ शारदा देवरे , प्रा. दिपाली घोरपडे,डॉ योगेश अग्रवाल, प्रा दीपक पवार,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. |

| | | |
|---|---|---|
| 4 | छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक समापण सोहळा व्याखान<br><br>**दिनांक** 03/08/2024 | संगाबा अमरावती विद्यापीठ चे विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त तत्वाधनाने छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक समापण सोहळा कार्यक्रम विद्यापिठाच्या परिसरात दिनांक 03/08/24 रोजी आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकानी या व्याखानात सहभाग घेतला. या कार्यक्रमावेळी कुलगुरू मिलिंद बारहाते , प्रोफ श्रीकांत कळीकर, रासेयो संचालक डॉ निलेश कळू उपस्थीत होते. सुविख्यात लेखक डॉ सत्पाल सोवले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर विचार मांडले. |
| 5. | क्रांतिदिन कार्यक्रम<br><br>**दिनांक** 09/08/24 | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अमरावती<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा समिति अमरावती व RTM युवा कैडर अमरावती यांच्या मार्फत क्रांतिदिनाचे औचित्य साधून ज्या स्वातंत्र्य सेनानी आपल्या मातृभूमीच्या रक्षणार्थ आपले प्राण पणाला लावले त्या सर्वांना श्रद्धांजली देण्याकरिता प्रार्थनेचे आयोजन दि ०९/०८/२०२४ रोजी स. ४:३० वाजता संत द्यानेश्वर संस्कृतिक भवन येथे करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकानी या कार्यक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना क्रांतीदिनाचे दिनाचे महत्त्व विशद केले. क्रांतीदिनाच्या औचित्याने स्वातंत्र्यासाठी बलिदान देणा-या तेजस्वी क्रांतीकार यांच्या बलिदानाचे व क्रांती लढ्याची माहिती विशद केली. |
| 6. | हरघरतिरंगा अभियान रैली'<br><br>**दिनांक** 15/08/24 | ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या समारंभाच्या निमित्ताने, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री मा. चंद्रकांत दादा पाटील यांच्या आवाहनावरून, आज गुरुवार १५ ऑगस्ट २०२४ रोजी अमरावती येथील शासकीय औषधनिर्माण महाविद्यालयातर्फे 'हर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी 'तिरंगा रॅली'चे आयोजन केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एन.इनामदार, रासेयो अधिकारी मोना यो. अग्रवाल यांच्या उपस्थितीत, कठोरा नाका कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा फडकावला आणि प्रत्येक घरात तिरंगा फडकावा अशा घोषणा दिल्या आणि जनजागृतीचा संदेश दिला. आमचा हिंदुस्तान जगात सर्वोत्तम आहे, वंदे मातरम, भारत माता की जय अशा घोषणा देत मिरवणूक काढण्यात आली. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी रॅलीमध्ये सहभागी झाले होते. जनजागृती रॅली महाविद्यालयाच्या कॅम्पसपासून सुरू झाली आणि विद्युत नगरमधून जात महाविद्यालयात संपली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक स्वराज, आयुष, अक्षत, प्रफुल्ल, दिव्या, आंचल, निर्भय, चैतन्य, अथर्व, प्रियेश आणि तनुजा यांनी अथक परिश्रम घेतले. |

| | | |
|---|---|---|
| 7. | सद्भावना दिवस<br><br>दिनांक 20/08/2024 | दिनांक 20/08/202४ रोजी शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविद्यायालय अमरावती येथे भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना दिवस साजरा करण्यात आला तसेच. सद्भावना दिवसाबद्दल आज महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. भारतात दरवर्षी २० ऑगस्ट रोजी 'सद्भावना दिन' साजरा केला जातो. सामान्यतः हा दिवस हार्मनी डे म्हणून ओळखला जातो. हा दिवस माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा वाढदिवस आहे. |
| ८ | मानसिक आरोग्य बाबत चर्चासत्र<br><br>**दिनांक** 20/09/2024 | दिनांक 20/09/2024 रोजी एनएसएस युनिट शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविद्यायालय अमरावती द्वारा zen zone counselling community यांच्या संयुक्त विद्यमाने  मानसिक आरोग्य बाबत चर्चासत्र आयोजीत करण्यात आले होते.मुख्य अतिथी म्हणून मा. ललित राठोड सर यांच्या उपस्थित “Mind your Mind” कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमामध्ये संस्थेतील विद्यार्थी यांना मानसिक आरोग्य आणि स्वास्थ्य या बाबत मार्गदर्शन करण्यात आला . कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयाचे विद्यार्थी, संस्थेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. |
| 9. | “स्वच्छता ही सेवा” पंधरवडा कार्यक्रम<br><br>**दिनांक** २०/०९/2024 | दिनांक 20/09/202४ रोजी एनएसएस युनिट शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविद्यायालय अमरावती तर्फे स्वच्छता ही  सेवा अभियान अंतर्गत स्वछ्तेची शपथ घेऊन विद्यार्थ्यांना स्वछ्ते बद्दल जागरूक करण्यात आले. विद्यार्थ्यांना स्वच्छ भारत मिशन या अभियानाची माहिती देऊन या अभियानात जास्तीत जास्त लोकांना सहभागी करण्याबाबत आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी श्रीमती मोना अग्रवाल, विद्यार्थी, संस्थेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते |
| 10. | रक्तदान शिबिर<br><br>**दिनांक** 25/09/2024 | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अमरावती आणि राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब यांच्या विद्यमानाने "जागतिक फार्मासिस्ट दिना निमित्त" बुधवार, 25 सप्टेंबर 2024 रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती यांच्या रक्तपेढी टीमच्या मदतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय फार्मास्युटिकल फेडरेशनने यावर्षी “Pharmacists: Meeting global health needs” ही थीम ठेवली आणि या थीमला पूर्ण न्याय देत महाविद्यालयाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले. यामध्ये एकूण 55 रक्तदात्यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाला यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अविनाश उकंडे व जनसंपर्क अधिकारी श्री. मिलिंद तायडे यांचे महत्वपूर्ण योगदान होते. |
| 11 | जागतिक फार्मासिस्ट दिन रॅली | विद्याभारती कॉलेज ऑफ फार्मसी अमरावती द्वारे जागतिक फार्मासिस्ट दिना निमित्त" बुधवार, 25 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 8 वाजता रॅली चे आयोजन करण्यात आले होते. शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अमरावती च्या विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारी म्हणून यात सहभाग घेतला. रॅली ची सुरुवात |

| | | |
|---|---|---|
| | **दिनांक** 25/09/2024 | विद्याभारती कॉलेज ऑफ फार्मसी परिसरातून डॉ सौंदळे, सिविल सर्जन, जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती यांच्या हस्ते करण्यात आली. |
| 12 | राष्ट्रीय पोषण माह<br><br>**दिनांक** 25/09/2024 | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अमरावती च्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे राष्ट्रीय पोषण माह निमित्य बुधवार, 25 सप्टेंबर 2024 रोजी "सही पोषण देश रोशन" या विषयावर पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली. श्रुती सोळंके एवं गायत्री टावरी को प्रथम और प्रथमेश नरकर यांना मूल्यमापनकर्ते तेजस्विनी गावंडे एवं दिव्या काळे यांनी प्रथम आणि द्वितीय विजेते घोषित केले. कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ. एन एन ईनामदार , राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी श्रीमती मोना अग्रवाल, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी, संस्थेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते |
| 13. | "विश्व हृदय दिवस" अंतर्गत स्वस्थ हृदय अभियान कार्यक्रम<br><br>**दिनांक** 29/09/2024 | जेनीथ हॉस्पिटल अमरावती द्वारा हृदय स्वास्थ्य मार्गदर्शन व जागरूकता कार्यक्रम २९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता संस्कृतिक भवन मोरशी रोड इथे आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणात डॉक्टर नीरज राघणी प्रसिद्ध हृदय रोग तज्ञ अमरावती द्वारे उदबोधन व प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले. सामाजिक जाणिवेतून आपल्यापैकी एखाद्याचे प्राण वाचविण्यासाठी संधी या उद्बोधनातून मिळेल या अनुषंगाने शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय,अमरावत येथील रासेयो पथकांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना हृदयविकाराचा झटका व्यवस्थापनाशी संबंधित अनेक नवीन गोष्टी कळल्या. विद्यार्थ्यांनी सीपीआर बद्दलचे Theoretical ज्ञान सीपीआर मॅनिकिनवर प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याचा प्रयत्न केला.सदर प्रशिक्षणात डॉ काजल केसवानी, आहार विशेषज्ञ, डॉ स्वप्नील रुद्रकर उपस्थित होते |
| 14 | डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती/ वाचन दिन<br><br>**दिनांक** 15/10/2024 | शासकीय औषधि निर्माण शास्त्र महाविद्यालय, अमरावती येथे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत डॉ.अब्दुल कलाम यांच्या जयंती व वाचन प्रेरणा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती, वर्ल्डमिसाईल मॅन डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती निमित्ताने स्टूडेंट्स डे (World Student's Day) साजरा केला जातो, त्यानिमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व इतर विद्यार्थ्यांनी त्यांना शब्दसुमनाने श्रद्धांजली अर्पित केली व प्रतिमा पूजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ. एन एन ईनामदार , रासेयो कार्यक्रम अधिकारी श्रीमती मोना अग्रवाल, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. |
| 15 | राष्ट्रीय एकात्मता दिन<br><br>**दिनांक** | शासकीय औषधि निर्माण शास्त्र महाविद्यालय, अमरावती येथे राष्ट्रीय एकात्मता दिनाचे आयोजन, इंदिरा गांधी यांच्या जन्मदिनानिमित्त १९ नोवेंबर हा दिवस संपूर्ण भारतामध्ये राष्ट्रीय एकात्मता दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात राष्ट्रीय एकात्मता दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची |

| | | |
|---|---|---|
| | 19/10/2024 | प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली . या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. |
| 16. | संविधान दिवस<br><br>**दिनांक** 26/11/2024 | दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी महाविद्यालयात 'संविधान दिवस' साजरा करण्यात आला. याप्रसंगी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून भारत देशाच्या संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ. एन एन ईनामदार , रासेयो कार्यक्रम अधिकारी श्रीमती मोना अग्रवाल, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. |
| 17 | जागतिक एड्स दिन<br><br>**दिनांक** 5/12/2024 | शासकीय औषधि निर्माण शास्त्र महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी जागतिक एड्स दिनानिमित्त रेड रिबन क्लब व जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती च्या वतीने आयोजित जनजागृती रॅलीमध्ये उपस्थित राहून या दुर्धर आजाराविषयी जनजागृती केली. रॅलीची सुरुवात जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथून करण्यात आली. रॅली इर्विन चौक, रेल्वे स्टेशन, राजापेठ, राजकमल चौक, कॉटन मार्केट, शेगाव नाका, पंचवटी त्यानंतर इर्विन चौक अशी काढण्यात आली. इर्विन चौक येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. |
| 18 | संत गाडगे बाबा पुण्यतिथि<br><br>**दिनांक** 20/12/2024 | शासकीय औषधि निर्माण शास्त्र महाविद्यालय, अमरावतीच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे दि . २०/१२/२०२४ रोजी कर्मयोगी गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आले . प्र प्राचार्य मा. डॉ. नजमा ईनामदार यांच्या हस्ते कर्मयोगी गाडगेबाबा यांच्या प्रति मेस पुष्पहार अर्पण करून अभि वादन करण्यात आले तसेच "कर्मयोगी गाडगे बाबा यांचे जीवनकार्य व दशसूत्री संदेश" या विषयावरील रासेयो अधिकारी डॉ पी र पाटील विद्यार्थांना मार्गदर्शन करताना संत गाडगे बाबा यांच्या जीवनकार्या चा आढावा विशद करीत विद्यार्थ्यां मध्ये गाडगे बाबांनी विशद केलेल्या दशसूत्रीतील मूल्यांची रुजवण व्हावी असे भाष्य केले.. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्दालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयो स्वंयसेवक मोठ्या संख्येनेउपस्थित होते. |
| 19 | वाचन संकल्प महाराष्ट्रचा उपक्रम<br><br>**दिनांक** 01-15 Jan 2025 | शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, कठोरा नाका अमरावती येथे जिमखाना व राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत महाराष्ट्र शासन निर्णयाच्या अनुषंगाने - वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम राबविण्यात आला. त्यात सर्वांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. २५ विद्यार्थ्यांनी आपापल्या आवडीचे पुस्तक घेऊन निरंतर वाचन करून ५०० शब्दात चिंतनात्मक व परीक्षणात्मक निबंध जिमखाना अधिकारी यांच्याकडे सादर केले. मराठी व इंग्रजी अशा प्रत्यकी तीन बक्षिसांचे वाटप २६ जानेवारी रोजी करण्यात येणार आहे. वाचन संकल्प अभियानात जवळपास ९४ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे.१४ ते २८ जानेवारी २०२५ दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जात असून महाविद्यालयातील ग्रंथालयात उपलब्ध मराठी कादंबरी, ग्रंथ यांचे प्रदर्शन केले आहे. सदर कार्यक्रमांतर्गत कविता लेखन, शुद्ध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहनमहाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नजमा इनामदार, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. मोना अग्रवाल, रासेयो सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. पुरुषोत्तम पाटील यांनी केले आहे.यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. देवरे, प्रा. डॉ. कोटगळे, प्रा. डॉ. खरात, सहायक ग्रंथपाल श्री. कोरडे व इतर प्राध्यापक परिश्रम घेत आहेत. |
| 20. | राष्ट्रीय युवा दिन<br><br>**दिनांक**<br>12/01/2025 | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अमरावती येथे आज दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी स्वामी विवेकानंद जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून तसेच राजमाता जिजाऊ यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच सकाळी ८:०० वाजता विवेकानंद कॉलनी येथील स्वामी विवेकानंद ग्रंथालय येथून निघालेल्या भव्य रॅलीमध्ये सुद्धा राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाने सहभाग नोंदविला. |
| 21 | शिवाजी जयंती<br><br>**दिनांक**<br>19/02/2025 | शासकीय औषधि निर्माण शास्त्र महाविद्यालय, अमरावतीच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे दि . 19/02/२०25 छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आले . प्र प्राचार्य मा. डॉ. नजमा ईनामदार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रति मेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच दिनांक 19 फेब्रुवारी 2025 रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्य महा रॅलीचे आयोजन सायन्सकोर मैदान अमरावती या ठिकाणापासून सकाळी ठीक 07.00 वाजता करण्यात आले व सदर महा रॅलीत रासेयो स्वयंसेवकानी उत्सुर्फ सहभाग नोंदविला. |
| 22 | संत गाडगे बाबा जयंती<br><br>**दिनांक**<br>26/02/2025 | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे २६ फेब्रुवारी रोजी सत्यपाल महाराजांचे शिष्य युवा प्रबोधनकार पवन दवंडे ह्यांच्या सप्तखंजेरी प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात कर्मयोगी गाडगेबाबा यांच्या प्रति मेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून करण्यात आली. यावेळी पवन महाराज दवंडे यांनी आपल्या वाणीतून समाजातील विविध विषयांवर सप्त खंजिरी च्या सुरात विद्यार्थ्यांना संबोधित केले.<br>सदर कार्यक्रम महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.मोना अग्रवाल, पुरुष कार्यक्रम अधिकारी डॉ. पुरुषोत्तम पाटील यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आले.या कार्यक्रमाचे यशस्वीते करीता रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी,आयुष महाजन,आयुष पोटे, साक्षी मुनेश्वर,जय चात्रेश्वर, गौरी अंबाडकर आदींनी अथक परिश्रम घेतले तसेच कार्यक्रमाला सर्व रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थीनी व शिक्षकवृंद उपस्थित होते |
| 23 | Womens day<br><br>**दिनांक**<br>10/02/2025 | औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कठोरा नाका अमरावती येथे जिमखाना व राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत 'बेटी बचाओ बेटी पढाओ व महिला सक्षमीकरण' याविषयावर पोलिस निरीक्षक दीप्ती ब्राम्हणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये जवळपास दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. दीप्ती ब्राम्हणे यांनी महिला सक्षमीकरणाबाबत विविध पैलूंची सविस्तर व सखोल दीप्ती ब्राह्मण उदाहरणांसह माहिती दिली. कायद्यामधील महिलांसाठी तरतुदी, त्यांचा योग्य वापर, सायबर सेक्युरिटी, विशाखा समिती मार्गदर्शक तत्त्वे, कौटुंबिक हिंसाचार, कार्यालयांमधील महिला कक्ष इत्यादी तसेच बेटी बचाओ बेटी पढाओ यासंदर्भात |

| | | |
|---|---|---|
| | | सध्याच्या युगात महिलांची वाढलेली शैक्षणिक गुणवत्ता व पातळी, स्वरक्षणासाठी दामिनी पथक, हेल्पलाइन नंबर ११२ याची माहिती दिली. प्राचार्य डॉ. नाजमा इनामदार यांनी दीप्ती ब्राम्हणे यांचे स्वागत करून मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. संचालन रासेयो अधिकारी डॉ. पुरुषोत्तम पाटील यांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ. देवरे, डॉ. कोटगळे, डॉ. खरात, इतर प्राध्यापकांसह शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. |

सकाळ

# औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयात वाचन संकल्प उपक्रम

**अमरावती, ता. २४ :** शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, कठोरा नाका अमरावती येथे जिमखाना व राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत महाराष्ट्र शासन निर्णयाच्या अनुषंगाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम राबविण्यात आला. त्यात सर्वांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. २५ विद्यार्थ्यांनी आपापल्या आवडीचे पुस्तक घेऊन निरंतर वाचन करून ५०० शब्दात चिंतनात्मक व परीक्षणात्मक निबंध जिमखाना अधिकारी यांच्याकडे सादर केले. मराठी व इंग्रजी अशा प्रत्यकी तीन बक्षिसांचे वाटप २६ जानेवारी रोजी करण्यात येणार आहे. वाचन संकल्प अभियानात जवळपास ९४ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे.



**अमरावती :** वाचन संकल्प उपक्रमात सहभागी विद्यार्थी व शिक्षक.

१४ ते २८ जानेवारी २०२५ दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जात असून महाविद्यालयातील ग्रंथालयात उपलब्ध मराठी कादंबरी, ग्रंथ यांचे प्रदर्शन केले आहे. सदर कार्यक्रमांतर्गत कविता लेखन, शुद्ध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नजमा इनामदार, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. मोना अग्रवाल, रासेयो सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. पुरुषोत्तम पाटील यांनी केले आहे.

यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. देवरे, प्रा. डॉ. कोटगळे, प्रा. डॉ. खरात, सहायक ग्रंथपाल श्री. कोरडे व इतर प्राध्यापक परिश्रम घेत आहेत.

Nagpur, Amravati-Today
25/01/2025 Page No. 3